दैनिक लोकनामा

## महत्त्वाचे



# वाघ अभियांत्रिकी संस्थेतर्फे उन्हाळी शिबिर

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक येथील एआयसीटीई आयडिया लॅबच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी पंधरादिवसीय उन्हाळी शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिर काळात नाशिक शहरातील विविध शाळांतील २५ विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला.

यावेळी शिबिरामध्ये ऑगमेंटेड रियालिटी, व्हर्च्युअल रियालिटी, ड्रोन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स, ३-डी प्रिंटिंग, लेझर कटिंग अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानांची ओळख करून देण्यात आली. याशिवाय विद्यार्थ्यांनी दोनचाकी रोबोटिक वाहन तयार करण्याचा अनुभव घेतला. तसेच प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. शिबिराच्या सांगता कार्यक्रमावेळी विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, मुख्यध्यापिका अश्विनी पवार, डॉ. निशा इंदाईत, डॉ. पद्माकर पवार, डॉ. प्रशांत कुशारे व डॉ. रवींद्र मुंजे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना लहान वयातच तंत्रज्ञानाची गोडी लागावी व त्यांनी नवकल्पना शिकाव्यात, हा शिबिराचा उद्देश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाविषयी आत्मविश्वास आणि कुतूहल निर्माण झाले असून, भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ यांनी दिली. शिबिर यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी मार्गदर्शन केले.